भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४६९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०६/२०१७

**१) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे स्कुटी चालकास धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. .:–**

दिनांक २४/०६/२०१७ चे १०.३० वा. दर. यातील फिर्यादी अकुंश फंदे वय २६ वर्ष, रा. सोमलवाडा हा स्स्त्याजवळील पाणठेल्याजवळ हजर असता मृतक लक्ष्मण बकाराम गायधने वय ७० वर्ष, रा. लाखनी हे एनएच ०६ रोड ने आपली स्कुटी क्र. एम. एच. ३१/ जी. एन २७०४ नी रोड क्रास करीत असता भंडारा कडुन साकोली कडे जाणाऱ्या यातील आरोपी ट्रक चालकाने आपले ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन स्कुटी चालकास सेलोटी फाटा येथे धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कुरील पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) स्व:तचे आर्थीक लाभा करीता अपव्यापार करुन वेळोवेळी विक्री केल्याने गुन्हा नोंद .:–**

सन २०१२ ते २३/०६/२०१७ पर्यत यातील फिर्यादीची आई आरोपी क्र. १ ने आरोपी क्र. २ याचे सोबत संगनमत करुन फिर्यादीस विवाहाची सक्ती केली तसेच आरोपीतांनी स्वत:चे आर्थीक लाभा करीता फिर्यादीचा अपव्यापार करुन वेळोवेळी विक्री केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३६६,३७० भांदवि. सहकलम ९,१०,११ बाल विवाह प्रतीबंधक अधि. २००६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कुरील पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) टिप्पर चालकांच्या निष्काळजीपणामुळे सायकल चालकास धडक मारुन पायाला जखम झाल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक ०६/०६/२०१७ चे १२.५५ वा. दर. यातील जखमी गंगाराम लहाणु मेघरे वय ५९ वर्ष, हे भाचीचे लग्नाकरीता बाम्हणी गावावरुन वाही गावी एकटाच सायकलने जात असतांनी पवनी कडुन निलजकडे जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील टिप्पर भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन जखमीचे सायकलला बेटाळा येथे धडक मारुन पायाला जखमी केल्याने व अपघाताची माहिती न देता पडुन गेल्याने फिर्यादी भोजराज गंगाराम मेघरे वय ३९ वर्ष, रा. बाम्हणी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४,१३४/१८७ (अ)(ब)मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) हमालीचे पैसे देण्याच्या कारणावरुन शिवीगाळ करुन डावे हाताचे कोपऱ्या जवळ ब्लेडने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २४/०६/२०१७ चे १९.०० वा . दर. यातील आरोपीने फिर्यादी रोषन उत्तम भांबारे वय २३ वर्ष, रा. सोमवारी वार्ड पवनी यांचे हमालीचे पैसे न देण्याचे कारणा वरुन फिर्यादीला शिवीगाळ करुन डावे हाताचे कोपऱ्या जवळ ब्लेडने वार करुन फिर्यादीला जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

५) हिंदुच्या धार्मीक भावना दुखावल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २४/०६/२०१७ चे १०.०० वा . दर. यातील अरोपीने आपले फेसबुक अकांऊटवर पंतप्रधान श्री. नरेन्द्र मोदी यांचे फोटोशी छेळखानी करुन त्यांच्या डोक्यावर मुस्लीम टोपी चेहऱ्यावर मुस्लीमा सारखी दाढी तयार करुन त्यावर थोडे दिन रुको मै खुद बेचुंगा बडे का असे पोस्ट करुन बडे का याचा अर्थ गाईचे मास असा प्रचलीत असुन गाई हिंन्दुना पवित्र असल्याने हिंदुच्या धार्मीक भावना दुखावल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९५(अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. कुंभरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

६) संगनमत करुन शिवीगाळ करुन काठीने व थापड बुक्यांनी मारपीट करुन फॅक्चर केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १६/०६/२०१७ चे २०.३० पासुन. यातील फिर्यादी बलधारी देवलाल बशिने वय ४० वर्ष, रा. खुटसावरी व त्याचा काका शामदास बशिने सोबत नहरावर लघवी करीता थांबले असता शामदास बशिने हा फिर्यादीला शिवीगाळ करीत आहे असे समजुन हातात काठी घेवुन दोन्ही मुलांसह फिर्यादीला 'तु शिव्या कशाला दिल्या' असे म्हणुन काठीने व थापड बुक्यांनी मारपीट करुन जखमी करुन डावे हाताला फॅक्चर केल्याने जखमी फिर्यादीचे बयान व डॉक्टर एक्सरे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२५,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निरगुडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

७) वैनगंगा नदीचे पाण्यात तरुणाचे प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोंद :–

दिनांक २३/०६/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील मृतक रोशन बळीराम बोरसरे वय २८ वर्ष, रा. कुंभारीटोला इंदीरा गांधी वार्ड भंडारा हा दारुचे आहारी गेलेला होता मृतक हा दिनांक २३/०६/२०१७ चे सायकांळी ०६.०० वा. घरी आईसोबत बोलुन पाया पडुन निघुन गेला होता आज रोजी सकाळी मृतक याचे प्रेत वैनगंगा नदीचे पाण्यात तरगतांना मिळुन आल्याने फिर्यादी अशोक बळीराम बोरसरे वय ३४ वर्ष, रा. कुंभारीटोला इंदीरा गांधी वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

८) अवैध दारु देशी/ जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक २४/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे सिहोरा, गोबरवाही व अडयाळ येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारु + १५० किलो सडवा किंमती ६,५००/–रु. तसेच जुगारातुन किंमती १,५३०/–रु. असा एकुण किंमती ८,०३० चा माल जप्त करण्यात आला आहे.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २४/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण २९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी १० तीन सिटर वाहनांवरती ३४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती २५२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

२५/६/१७

पोनी. एम. एम. सिडाम
जिवीशा शाखा भंडारा
दुरध्वनी.क्र ८६९८७३९१९६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.